| MAY | | | | | | 2015 |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

WEDNESDAY

WEEK 15

DAY 098-267

DATE 08.04.2015

दासनवमी
७ मार्च २०२१

08
APRIL

श्रीराम समर्थ

यो जातो मरुदेशजक्षितितले सम्बोधयन् सज्जनान् ।
ग्रंथं यो रचयन् सुपुण्यजनकं श्रीदासबोधाभिधम् ।
यः कीर्त्या पठनेन सर्वविदुषां स्वान्तापहारी सदा ।
सोऽयं मुक्तिकरः क्षितौ विजयते श्रीरामदासो गुरुः ॥

नमो आदि बोधात्मरूपा परेशा ।
नमो हंस नारायणा निर्जरेशा ।
नमो ब्रह्मदेवा वसिष्ठा श्रीरामा
नमो मारुती रामदासाभिरामा ॥

डोळां पहावी रघुवीर मूर्ति
कर्णी पडावी रघुवीर कीर्ति ।
सदा घडावी रघुवीर सेवा
देवा असा छंद मला जडावा ॥

समाधी रुपांत प्रतिमेला । उजळल्या आहेत कळे त्याला ।
[illegible] नाही निश्चल ।

रामदासांच्या कुटुंबातही नित्य कोपरा [illegible] होता.
हनुमानाच्या हातात [illegible] आहे ।

तुकाराम महाराज – अभंग —
हरि न अर्थ न काम न [illegible] ।
मोक्ष न हेतु नाही.

© www.madhaveeraghuveer.com

| APRIL | | | | | | 2015 |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

॥ श्रीराम समर्थ ॥

श्रोते पुसती कोण ग्रंथ । काय बोलिले जी येथ ।
श्रवण केलियाने प्राप्त । काय आहे ॥ श्रीराम ॥

ग्रंथा नाम दासबोध । गुरुशिष्यांचा संवाद ।
येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग ॥ श्रीराम ॥

भगवद्वचनी अविश्वासे । ऐसा कोण पतित असे ।
भगवद्वाक्याविरहित नसे । बोलणे येथीचे ॥

आता श्रवण केलियाचे फळ । क्रिया पालटे तत्काळ ।
तुटे संशयाचे मूळ । एकसरा ॥

नासे अज्ञान दुःख भ्रांति । शीघ्रचि येथे ज्ञानप्राप्ति ॥
ऐसी आहे फलश्रुती । इये ग्रंथी ॥ श्रीराम ॥

ज्याचा भावार्थ जैसा । तयास लाभ तैसा ।
मत्सर धरी जो पुसा । तयास तेचि प्राप्त ॥

© www.madhaveeraghuveer.com

दासबोधाचे अलौकिकपण —

जीवनातील सर्व समस्यांची उकल यात केली आहे. प्रपंचातील प्रश्नांचे निराकरण। प्रपंच - परमार्थ यांची सांगड

जीवात्मा परमात्मा। पिंड - ब्रह्मांड। भुक्ति मुक्ति
इहलोक परलोक। अभ्युदय - निःश्रेयस
या सर्वांचा तारतम्याने विचार केला आहे।
सोप्याकडून कठीणाकडे नेतात.
सर्वसामान्य श्रोत्यांची नाडी ओळखली आहे.
साधकांना प्रपंच हा आवडीचा विषय असतो. त्याचे सविस्तर वर्णन करत करत, श्रोत्यांना त्यामध्ये गुंतवत ते हाताला धरून परमार्थमार्गाला नेतात. | भगवद्गीता योगवसिष्ठ। भागवत

हाडाचे शिक्षक — मानसशास्त्रज्ञ
संवादामुळे गहन विषय हलका होतो. श्रोत्यांच्या मनातील संशयाचे निरसन होते. उत्सुकता वाढते. जवळीक निर्माण होते. ग्रंथ आपलासा वाटायला लागतो.
स्वगुणपरीक्षा - अ ब क ड यामध्ये नर समाजामध्ये अवती भवती दिसणाऱ्या वास्तवतेचे दर्शन घडवतात. यातील कितीतरी व्यक्ती आपल्या ओळखीच्या वाटतात.
विषयांचे वैविध्य - एकसुरीपणा येत नाही.
अनेक विषय अवगत - पारंगत
तिरंदाजी, घोडेस्वारी, गलोल चालवणे, संगीत - गायन - वादन - नृत्य, केवलकला, उद्यानशास्त्र, खगोलशास्त्र.
बांधकामशास्त्र - विटांचा आकार। कशा भाजाव्यात?
पाकशास्त्र — चटणी, कोशिंबिरी, रायते ---
कामाचा दांडगा उरक — चपळपणा — झपझप चालणे ---
भव्य, दिव्य कामे करण्याचा सपाटा — सामर्थ्य
∴ इतर संतांना आपण संत म्हणतो परंतु रामदासस्वामींना आपण समर्थ म्हणतो..

© www.madhaveeraghuveer.com

संस्कृतीच्या अष्टांगांवर त्यांनी प्रकाश टाकला —

१. राजकारण — ५. वाङ्मय
२. धर्मकारण — ६. कला
३. अर्थकारण — ७. विज्ञान
४. समाजकारण — ८. शिक्षण

सर्व अंगांचा साकल्याने विचार केला आहे.

आधिभौतिक - व्यष्टि — जीव
आधिदैविक - समष्टि — जगत
आध्यात्मिक - परमेष्टि — जगदीश

समाजातील सर्व प्रकारच्या जाति-वर्ण-पंथ यांच्याशी प्रत्यक्ष संबंध आल्याने समाजाच्या गरजा / अडचणी त्यांना ठाऊक होत्या. भिक्षेच्या माध्यमातून समाजनिरीक्षण —

नित्य नूतन हिंडावे। उदंड देशाटण करावे।
तरीच भिक्षा मागावी करावे। [illegible] ॥१४ २.८॥

भिक्षा म्हणजे कामधेनु
यातून समाजनिरीक्षण - लोकांची स्थिती - राजकीय स्थिती — परिवर्तन — स्वधर्मपालन — उत्तम समाजबांधणी

परदेशामध्ये देखील उत्तम समाज घडवण्यासाठी अनेक थोर विचारवंतांनी लेखन केले आहे. या सर्व ग्रंथांचा मूळ आधार असणारी चार तत्वे आहेत.

Self help
Management
Relationship
Leadership — महंत लक्षणे, उत्तम लक्षणे - नेतृत्व

आचरणात आणायलाच हवा असा हा दासबोध खरोखर 'ग्रंथराज' आहे.

प्रथम - २१ समासी (जुना दासबोध)
नंतर ७ दशक लिहिले. ८ वा ज्ञानदशक त्यांनी आधीच लिहून ठेवला होता. श्री ~~समर्थांच्या निर्वाणानंतर भीमस्वामी~~ ~~शहावकरांनी~~ उरलेले १२ दशक जोडले ~~— १२~~ = २० दशक



© www.madhaveeraghuveer.com

श्री ग्रंथराज दासबोधाची जन्मभूमी - शिवथरघळ सुंदरमठ येथे भव्य जलप्रपाताच्या जवळ असलेल्या घळीमध्ये शिवोत्तम अशा योगिराज कल्याणस्वामींनी लिहिला. इ. स. १६५८ मध्ये अफजलखानाचे पारिपत्य झालेले होते. स्वराज्यस्थापनेची शुभचिन्हे दिसू लागली होती. श्री शिवरायांसारखा शूर बहाद्दर नेता महाराष्ट्रामध्ये राज्यविस्तार करत होता. अशा प्रसन्न मनःस्थितीमध्ये समर्थांनी दासबोधासारखा अनुपमेय अमोल ग्रंथ सांगितला. ज्याचा लेखक कल्याणस्वामी होते. या घटनेची तुलना महाभारताचे कर्ते वेदव्यास आणि त्यांचे लेखन अत्यंत वेगाने करणारे श्रीगणेश यांच्याशी करण्याचा मोह होतो.

या ग्रंथाच्या कितीतरी प्रती काढल्या गेल्या. शिष्य-प्रशिष्य परंपरेतून त्याचे पुनर्लेखन केले आणि अनेक ठिकाणी ते वितरितही केले गेले. आजही धुळ्याच्या वाग्देवता मंदिरामध्ये या ग्रंथाची मूळ प्रत पहायला मिळते. असा हा सारपणाने असणारा ग्रंथराज असा अद्भुत आहे की जितक्या वेळा त्याचे वाचन पठण अध्ययन करावे तितक्या वेळा त्यात नवनव काहीतरी सापडत जाते.

विरता विरळा विवेक कळे लोकां ।

समाजातील आदर्श पुरुष कसा असावा याचे विवेचन करताना समर्थांनी अनेक वेळा सिद्धलक्षण, निःस्पृहलक्षण, महंतलक्षण, तसेच उत्तमपुरुषनिरूपण अशा निरनिराळ्या समासांमध्ये निरनिराळ्या पैलूंच्या माध्यमातून उत्तम गुणांचे विवरण केले आहे. पण अर्थातच असे आदर्श समाजामध्ये अल्प प्रमाणात दिसून येतात.

सहस्रांमध्ये कोणीयेक । पाहे देवाचा विवेक ।
परि त्या देवाचे कौतुक । ठाई न पडे ॥ ८.१.१३॥

परंतु हीच वस्तुस्थिती आहे. कडुलिंबाची झाडे ठायी ठायी आढळतात. परंतु चंदन मात्र अभावानेच दिसतो. कावळ्यांच्या कलकलाटाच्या मानाने कोकिळा कमीच असतात.



© www.madhaveeraghuveer.com

अशा या प्रापंचिकांच्या गदारोळामध्ये संत-महंत, विद्वान महात्मे विरळाच आहेत. आणि दुसरी गोष्ट अशी की अशा विभूति अगदी आपल्या अवती भवती असल्या तरी त्यांचा मोठेपणा सामान्यांना चटकन समजत नाही आणि समजला तरी तो मान्य होत नाही. परंतु सामान्यांना जरि त्यांची थोरवी कळली नाही तरी परमेश्वराने त्याला आपले म्हटलेले असते.

बरे ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजाभोवानी ।
परंतु विचार पाहोनि । कार्य करणे ॥ १८-६-२१॥

किंवा अगदी उपनिषदवचन देखील असेच आहे.

नायमात्मा प्रवचनेन लभ्यः न मेधया न बहुधा श्रुतेन ।

अशा फारच थोड्या भाग्यवंतावर ईश्वराची कृपा झालेली असते. जो ईश्वराला निवडतो, त्याला ईश्वराने आधीच निवडलेले असते. अशा थोर महंतामध्ये अग्रस्थानी श्री समर्थ विराजमान आहेत. ही सर्व त्या सर्वसाक्षी ईश्वराची कृपा आहे. असे अत्यंत विनयाने समर्थ सांगतात. हे जे काही प्राप्त झाले आहे. ते देणे ईश्वराचे आहे. अशा पुरुषाचे जीवन अर्थातच सर्वसामान्य राहत नाही. ज्याच्यावर ईश्वराची कृपा झालेली असते त्याच्या हातून कितीतरी भव्य, दिव्य कार्य घडते. त्याच्या जीवनात अद्भुतपणा, भव्यपणा, नाट्य, चमत्कार, धर्मस्थापना अशा अचाट गोष्टी दिसून येतात. आणि हेच श्रीसमर्थ आपल्या ग्रंथराज दासबोधामध्ये 'देणे ईश्वराचे' असे पालुपद असणाऱ्या काही ओव्यांमधून मांडत आहेत. द. १८ स. ६ ओवी १४ ते २१

सकळकर्ता तो ईश्वर । तेणे केला अंगिकार ।
तया पुरुषाचा विचार । विरळा जाणे ॥ १३॥

या सृष्टीमध्ये घडणाऱ्या प्रत्येक कार्यामागील प्रेरणा ही ईश्वराचीच आहे. सगळ्याचा कर्ता करविता तोच आहे.



© www.madhaveeraghuveer.com

असा ईश्वर ज्याच्या अंगिकार करतो, ज्याच्यावर कृपा करतो त्याचे जीवन उजळून निघते. अशा पुरुषाचे जीवन मात्र एखाद्यालाच कळते. त्याच्या जीवनामध्ये ईश्वराने दैवी सद्गुणांची अगदी लयलूट केलेली दिसते. न्याय, नीति विवेक, विचार हे गुण तर अशा पुरुषाचा स्थायी भावच बनून जातो. ~~प्रत्याने~~ सत्यभाषण, सदाचरण तर त्याच्या रोमरोमात भरून राहतात.. असा दैवी पुरुष कधीच कोणावर अन्याय करू शकणार नाही. कुणी अन्याय वर्तन आढळले तर तो त्याचा प्रतिकार करतो. सन्नीतीने वागणे हा त्याचा स्वभावधर्मच होऊन बसतो.

जनीं निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे।
जनीं वंद्य ते सर्वभावे करावे॥

कितीही कठीण प्रसंग आला तरी त्यावर सारासार विचार करून पण तरीही चटकन निर्णय घेणे त्याला उत्तम प्रकारे साधते. त्याची बुद्धि सत्वशीलतेमुळे अत्यंत तरल, तल्लख झालेली असते. त्यामुळे त्याचे निर्णय सहसा चुकत नाही. एवढेच नाही तर त्याच्या वाणीला वरून प्राप्त झाले असल्याने त्याचे बोलणे कधीही खोटे ठरत नाही. वाचासिद्धी - । अशा महापुरुषाचे मन देखील अतिशय विशाल झालेले असते. ते विश्वमनाशी तदाकार झाले असल्याने इतरांच्या अंतःकरणाची पारख त्याला सहजच होते. परांतर राखो जाणे।

न्याय नीति विवेक विचार। नाना प्रसंगप्रकार।
परीक्षणे परांतर। देणे ईश्वराचे ॥१४॥
महायेत्न सावधपणे। समई धारिष्ट धरणे
अद्भुतचि कार्य करणे। देणे ईश्वराचे ॥१५॥

सामान्य मनुष्याला अचंबा वाटावा अशी मोठाली कार्ये या अशा महात्म्यांच्या हातून अगदी सहज घडत असतात.

माऊलि - १६ व्या वर्षी ज्ञानेश्वरी

आद्य शंकराचार्य - ३२ वर्षांच्या आयुष्यात संपूर्ण भारतभ्रमण, चार मठांची स्थापना, ग्रंथरचना, भाष्य, स्तोत्ररचना वैदिक धर्माची प्रतिष्ठापना।

© www.madhaveeraghuveer.com

# 15 APRIL

WEDNESDAY
WEEK 16
DAY 105-260
DATE 15.04.2015

| APRIL | | | | | | 2015 |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

08 शांतिब्रह्म एकनाथमहाराज, जगद्गुरु तुकाराम महाराज
स्वतः श्री समर्थ - ११०० मठ, मारुतीची मंदिरे
09 व्यायामशाळा, शिष्य - प्रशिष्यांच्या पिढ्या, जनसामान्यांना
मार्गदर्शन, गुप्त राजकारण —
10 रामदासी संप्रदाय - दासबोध, आत्माराम, मनोबोध
अभंग, भजने, आरत्या, भारुडे, डफगाणी, कूटप्रश्न - - - -
11 खबरदारीने केलेला अति मोठा प्रयत्न सिद्धीला जाणे
हो ईश्वरी कृपाच आहे.
12 पहिले ते हरिकथा निरूपण। दुसरे ते राजकारण।
तिसरे ते सावधपण। सर्वविषयी॥ श्रीराम॥
13 प्रपंचातही सावध राहणे आवश्यक असते. त्यापेक्षा
परमार्थात त्याची गरज अधिक असते. अखंड चाळणा करावी
14 अंतर्मुख होऊन विवेक करावा.
विवेक —— वैराग्य आग्र्याहून सुटका - छत्रपती
15 जीवनात कितीही कठीण प्रसंग आला तरी विवेकशील
पुरुषाचा धीर सुटत नाही. अनपेक्षित प्रसंगांना तो धैर्याने
16 तोंड देत असतो. अगदी हिंस्र श्वापदेदेखील सामर्थ्यासमोर
गरीब गाय होऊन जात असत.
17 यश, कीर्ति प्रताप महिमा। उत्तम गुणांसी नाही सीमा।
नाही दुसरी उपमा। देणे ईश्वराचे॥
18 आज शेकडो वर्षे लोटली तरी संतांच्या महिमा किंचितही
कमी झालेला नाही. त्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांनी
19 समाजामध्ये परिवर्तन घडवून आणले. लोकांची मने वळवून
त्यांच्याकडून धर्मकार्य करवून घेतले. शिवाय लौकिक जीवनही
20 सुधारले. त्यांना मिळालेले यश त्यांच्या निर्वाणानंतर देखील
इतकी वर्षे टिकून आहे. मरावे परी कीर्तिरूपे उरावे।
त्यांच्यामध्ये इतक्या उत्तमोत्तम गुणांचा साठा होता की
त्याला दुसरी उपमाच नाही. कारण हे सर्व देणे आहे ते
ईश्वराचे आहे.
नामोळीच्या फुग्यावर, देहाचा आकडा लेकड्याच्या प्रवासाला
2015 नकाशा वावडा। करवंदाला चोक आन अळूलाहि लाज
कोणी नाही पाहे तरी लाजाळूला लाली देत कोण?

© www.madhaveeraghuveer.com

परमेश्वर हाच सकळकर्ता आहे. तो उत्तम गुणांची उधळण करीत असतो. प्रत्येकाला देण्यासाठी काही ना काही त्याच्याकडे असतेच. कुणाला चंद्रासारखे मुख, कुणाचे हरणासारखे डोळे, कुणाचे कोवळसडक केस तर कुंदकळ्यांसारखे दात- कुणाच्या बोटात चित्रकला, नृत्यकला, वादनकौशल्य, कुणाला सत्ता-संपत्ति, नेतृत्व, कर्तृत्व, वक्तृत्व, दातृत्व दिले आहे. मात्र या मध्ये आपला काहीच सहभाग नाही हे जे काही मला मिळाले आहे ते देणे ईश्वराचे आहे ही नम्र भावना मात्र हवी.

मी कर्ता ऐसे म्हणसी। तेणे तू कष्टी होसी।
राम कर्ता ऐसे म्हणता। यश कीर्ति विश्राम ॥

आणि एकदा ते काम रामाचे आहे असे म्हणून त्याच्यावर सोपवले की ते उत्तमही होते व त्याचा शीण येत नाही.

देव ब्राह्मण आचार विचार। कित्येक जनासी आधार।
सदा घडे परोपकार। देणे ईश्वराचे।

श्री समर्थ शिवछत्रपतींना 'बहुत जनांसी आधारु' असे म्हणत असत. धर्मरक्षण करण्याच्या बाबतीत शिवाजी महाराजांच्या तोडीचा कोणीही नाही अशी श्री समर्थांची धारणा होती. खरे तर दोघांचीही विचारधारा एकच होती. समर्थांची चेतक तर छत्रपतींची कृतिपर्यवसायी होती. दोघांचेही कार्य परस्परांना समांतर व पूरक होते. समर्थांचा प्रयत्नवाद, राष्ट्रवाद व पुरुषार्थ या सर्वांचे स्वच्छ प्रतिबिंब महाराजांच्या चारित्र्यात आढळते. खरोखर त्यांच्यातील दैवी गुणांना समर्थांच्या मार्गदर्शनाने झळाळी मिळाली. खरे तर हे दोघेही लोकोत्तर पुरुष होते. साक्षात विभूतिमत्वाचे सर्व घटक त्यांच्यात होते.

यद्यद् विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा।

कारण हे देणे ईश्वराचे आहे. पराक्रम, शौर्य, मुत्सद्दीपणा, प्रसंगावधान, रयतेविषयी आस्था व कळकळ — शिवाजीमहाराज

©www.madhaveeraghuveer.com

दुसऱ्याचे चालणी चालावे। दुसऱ्याचे बोलणी बोलावे।
दुसऱ्याच्या मनोगते जावे। मिळोनिया।
~~श्री जनाम~~

ऐहलोक परलोक पाहणे। अखंड सावधपणे राहणे।
बहुत जनांचे साहणे। देणे ईश्वराचे॥

प्रपंच + परमार्थ – सांगड
दक्षता । पुष्कळांचे पुष्कळ सोसणे
संतांना समाजाची टीका सोसावी लागली

मना श्रेष्ठ धारिष्ट्य जीवी धरावे
मना बोलणे नीच सोशीत जावे।
स्वये सर्वदा नम्र वाचे वदावे।
मना सर्व लोकांसी रे नीववावे॥८॥

सुवर्णमध्य साधता येणे – प्रतिकूल परिस्थितीतही मनाचा
समतोल ढळू न देणे हे कठीण आहे.

★ देवाचा कैपक्ष घेणे। ब्राह्मणाची चिंता वाहणे।
बहु जनासी पाळणे। देणे ईश्वराचे॥१८॥

लोकसंग्रह – वरच्या पायरीवर, उन्नतिकडे नेणे.
जनसामान्यांचे विचार जाणून घेऊन त्यांच्या भाषेत
त्यांच्याशी बोलता यायला हवे.

कधी गलबला कधी निवळ
ऐसा कंठीत जावा काळ॥

एकांत + लोकांत – सांगड

धर्मस्थापनेचे नर। ते ईश्वराचे अवतार।
झाले आहेत पुढे होणार। देणे ईश्वराचे॥२०॥

जे पुरुष धर्मस्थापना करतात त्यांच्यात ईश्वरी अंश असतोच
असे पुरुष पूर्वीही झाले आहेत आणि पुढेही होणार आहेत
धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे।
असे भगवंतांचे वचन आहेच. ज्या ज्या समर्थ पुरुषांमुळे
सद्धर्माची उभारणी होते ते सर्व पुरुष म्हणजे ईश्वराची
देणगीच आहे.

© www.madhaveeraghuveer.com

उत्तम गुणांचा ग्राहिक। तर्क तीक्ष्ण विवेक।
धर्मवासना पुण्यश्लोक। देणे ईश्वराचे॥२१॥

गुणी गुणं वेत्ति। या न्यायाने जे स्वत: सद्गुणी असतात, त्यांना दुसऱ्यांमधील गुणांची चांगली पारख करता येते. त्यांची सूक्ष्म बुद्धि, तल्लख निर्णयशक्ती, नीरक्षीरविवेक। शुभवासना। पुण्यकर्म

सकळ गुणांमध्ये सार। तजविजा विवेकविचार।
जेणे पाविजे पैलपार। अत्रपरत्रींचा॥२२.

प्रपंच परमार्थ, भुक्ति मुक्ति, अभ्युदय निःश्रेयस यांचा विवेक असणे हेच सर्व गुणांचे सार आहे. असे थोर पुरुष स्वत: तर उध्दरून जातात आणि समाजाला तारून नेतात.

स्नान वस्त्रे नाना भूषणे। येणे शरीर शृंगारणे
विवेके विचारे राजकारणे। अंतर शृंगारिजे॥ १८.६.१।
रूप गुण अभ्यासिता न ये। सहज गुणासी
न चाले उपाये। काहीतरी धरावी सोय। आगंतुक गुणांची॥

जो जनामध्ये वागे। जनावेगळी गोष्टी सांगे।
ज्याचे अंतरी ज्ञान जागे। तोचि साधु॥ श्रीराम॥

सकळ करणे जगदीशाचे। आणि कवित्वाचि काय मनुष्याचे।
ऐशा अप्रमाण बोलण्याचे। काये घ्यावे॥ श्रीराम॥

ऐसी ही विचारांची कामे। उगेच भ्रमो नये भ्रमे।
जगदीश्वरे अनुक्रमे। सकळ केले॥ श्रीराम॥

© www.madhaveeraghuveer.com

भाग- ९८.५ ०५   उपनि- २२.२९
६.३.९२   ९८

६ मार्च २०२१
दासनवमी

॥ श्रीराम समर्थ ॥

अध्यात्मग्रंथांचा अभ्यास करत असताना वारंवार वाचनात येणारा शब्द म्हणजे ब्रह्म। या ब्रह्माचा ब्रह्मदेवाशी नसा काहीही संबंध नाही. ब्रह्मदेव ही पुष्कळच नंतरची स्थिती आहे. इथे ब्रह्म म्हणजे मूळब्रह्म किंवा परब्रह्म!

(बृहत्) ब्रह्म याचा अर्थ बृहत् म्हणजे निरतिशय विशाल सर्वात मोठे! याच्यापेक्षा मोठे, व्यापक किंवा सूक्ष्म या ब्रह्मांडात काहीही नाही. या सृष्टीतील जड आणि चेतन अशा सर्व विश्वाला पोटात घेऊन जे कोरे अस्तित्व आहे त्याला ब्रह्म असे म्हटले आहे. या ब्रह्माच्या ठिकाणी काळाची धारा वाहत नाही. स्थळाचा विस्तारही नाही आणि कारण-कार्यता ही नाही. त्याला स्वयंभू म्हणणे हे देखील त्याला कमीपणा आणण्यासारखे आहे. कारण भू म्हणजे होणे. परंतु इथे होण्याचा Becoming चा प्रश्नच उद्भवत नाही. ते पूर्वी कधी काळी नव्हते व नंतर निर्माण झाले अशी स्थितीच नाही. तर ते आहेच आहे म्हणून ते सन्मात्र आहे. तिथे अस्तित्व आहे. Being आहे तिथे Isness आहे. It is there always. अब्जावधी वर्षांपूर्वी ते होतेच आताही आहे आणि पुढेही असणार आहे.

(Being Becoming) परंतु त्याचे वर्णन करताना मात्र मर्यादा पडतात आणि म्हणूनच त्याचे वर्णन नाहीपणाने करावे लागते. ते निर्गुण, निराकार, निरवयव, निरंजन, निरुपाधिक, निरुपम निर्लेप, निश्चल, निष्कल, निर्दोष, निःसंग, निराभास, निराधार. अद्वैत, अतर्क्य, अजन्म, अव्यक्त, अपार, अखंड, अनंत, अच्युत आहे. ते अनिर्वाच्य, वर्णनातीत आहे. मानवी कल्पनेच्या पलीकडे आहे ते कमालीचे सूक्ष्म असून सर्वांच्या ठिकाणी निरंतर भरले आहे. सर्वांच्या अंगाला बिलगून आहे. अनेकांमध्ये एकपणाने ते सदोदित टिकते. राजा-रंक, स्त्री-पुरुष, उच्च-नीच, सर्वांना समान आहे.

ब्राह्मणाचे ब्रह्म ते सोवळे, शूद्राचे ब्रह्म ते ओवळे असे कधीच नसते. ते अमुक एक असे नसून सर्व काही आहे ज्याला ते पहायचे असेल त्याने तेच होऊन त्याला पहावे.

संत x सामान्य

मात्र जे साक्षात्कारी महाभाग असले आहेत, अशा संतांना सर्वत्र केवळ एक दृश्याधार, निर्मळ, गगनाहून व्यापक अशी चिन्मय वस्तु प्रतीतीला येते. आणि याच्या अगदी उलट सर्वसामान्य माणसाला मात्र अनित्य, चंचल, दोषयुक्त, परिच्छिन्न, बदलणारे दृश्य विश्व प्रतीतीला येते.

यामध्ये संतांचा अनुभव पूर्णपणे सत्य आहे, यात काही शंकाच नाही. परंतु सामान्य माणसाचा अनुभवही काही खोटा म्हणता येणार नाही. ही गोष्ट निःसंशय निर्विवाद आहे. कारण आम्ही ज्या जगात जगतो, वाढतो, खेळतो, वावरतो ते जग खोटे कसे म्हणायचे? असा सामान्य माणसाचा सवाल आहे आणि तो रास्तही आहे.

एकपणाने विकसणाऱ्या परब्रह्माने हे अनेकत्वाने भरलेले विश्व कसे निर्माण झाले? ही खरी समस्या आहे. या समस्येचे उत्तर आहे मूळमाया!

केवळ एक, नित्यमुक्त, अक्रिय, अखंड अशा परब्रह्माच्या ठिकाणी स्वतःची जाणीव निर्माण झाली. म्हणजेच 'मी ब्रह्म आहे' असे स्फुरण उत्पन्न झाले. मूळचा हरि संकल्प तो हाच! याला हे नाव शक्य आहे?

निश्चळ गगनी चंचळ वायु। — — —
ऐसी आत्मस्थिती संचली। तेथे माया कैसी जाली।
ऐसी आकाशी वाहिली। शून्यत्व नासोनी॥

आकाशात जशी वायूची झुळूक उठावी तशी शुद्ध आत्मस्थितीमध्ये स्फुरण रूपाने माया उत्पन्न झाली. या मूळमायेमध्ये दोन अभिन्न अंगे असतात.

१. शुद्ध व संपूर्ण ज्ञानमय जाणीव — — —
मूळपुरुष, ईश्वर, अंतरात्मा, शिव, पुरुष.

२. संपूर्ण शक्तिगर्भ सामर्थ्य हे दुसरे अंग आहे. त्यामध्ये त्रिगुण व पंचमहाभूते वास करतात.

©www.madhaveeraghuveer.com

एखादे कणीस उकलले की त्यामध्ये गुप्तरूपाने असणारे दाणे बाहेर पडतात. तशी मूळमाया उकलली की त्यातून अष्टधा प्रकृति बाहेर पडते.

प्रथम एकटे परब्रह्म होते. मी पुष्कळ रूपाने प्रकट व्हावे अशी इच्छा त्याला झाली. एकोऽहं बहुस्याम् प्रजायेयम्। असे स्फुरण झाले. ज्ञानमय व शक्तिमय.

त्रिगुण व पंचमहाभूतांच्या कर्दमातून हे विश्व निर्माण झाले. ज्या क्रमाने या विश्वाची उभारणी झाली त्याच्या उलट क्रमाने त्याचा संहार होतो. तो व्हायचा तेव्हा होऊ दे. परंतु माणसाने जर का विवेकाने तत्त्वशोधन केले तर त्याला प्रकृतीचा लय करून मूळमायेपर्यंत पोहोचता येईल. ईश्वराची कृपा होऊन त्याच्यापुरता प्रकृतीचा लय होतो. मूळमायेला पार करता आणि परब्रह्मापर्यंत पोहोचता. याला 'विवेकप्रलय' म्हणतात.

इतकं सोपं आहे त्याच्याशी तद्रूप होणं! पण खरंच सोपं आहे का? केवळ शब्दांनी नव्हे किंवा कृतीनेही नव्हे तर हा प्रवास विवेकाने करायचा आहे. विवेकानेच एक एक तत्त्व एक एक गुण बाजूला सारायचा आहे. पंचतत्त्वांचे महाद्वार ओलांडायचे आहे.

त्यासाठी आधार घ्यायचा आहे तो शास्त्रांचा. म्हणजे मूळमायेच्या जागेकडे पाहण्याच्या दोन दृष्टी आहेत.

१. 'मी' केंद्रित अज्ञान दृष्टी
२. 'ईश्वर' केंद्रित ज्ञान दृष्टी

मी या जगाचाच घटक असून तुकडा स्वतःला जगापासून वेगळा समजतो आणि दुजेपणाने जगाकडे पहातो.

परंतु तरीदेखील अज्ञान दृष्टीला देखील स्थूल भौतिक व जगातील शक्तीचा अनुभव येतो.

अचेतनामध्ये वीज (पंखा, बल्ब, फ्रीज, हीटर) उपकरणांना, हलणे, प्रकाश या रूपाने काम करते तर सचेतनामध्ये प्राण संकल्प, विचार, कल्पना या रूपाने शक्तीच काम करते.



© www.madhaveeraghuveer.com

परंतु अज्ञान दृष्टीला शक्तीने घडवून आणलेले कार्य प्रत्यक्ष दिसले तरी शक्तीचा साक्षात परिचय होत नाही. याउलट ज्ञानदृष्टी असणारे महात्मे जाणतात की सच्चिदानंद परमेश्वर हेच या सृष्टीचे अधिष्ठान आहे आणि ज्ञानमय स्फुरण हीच त्याची ईश्वरी शक्ती आहे.

ईश्वर आणि त्याची चित्शक्ती यांच्यात स्वरूपात व क्रियेत भेद नाही. एकच ईश्वर स्थिररूपाने शिव दिसतो आणि तो गतिमान झाला की शक्ती म्हणून अनुभवास येतो. हेच शिवशक्तीचे स्वरूप आहे. अर्धनारीनटेश्वरामध्ये हेच अद्वैत आहे.

विश्वाचा कारभार बिनबोभाट पार पाडणारी शारदाच आपल्या शरीरातही काम करते. तो गणेश तर ती शारदा तो पुरुष तर ती प्रकृति, तो प्राण तर ती वाचा! हे सर्व शब्द समानार्थी नाहीत परंतु तरीही कार्याच्या विभागणीनुसार हे शब्द इथे योजले आहेत.

हा सारा मूळमायेचा पसारा आहे.

मायावळी जोपावली। नाना देहफळी लगडली।
मुळीची जाणीव कळो आली। फळामध्ये॥
नाना देवी भजन केले। ते मूळ पुरुषासी पावले।
याकारणे सन्मानिले। पाहिजे सकळ काही॥

विश्व प्रसवा शारदेचाच हा सारा खेळ आहे. हीच शारदा सद्गुरूंच्या कृपाने साधकाच्या मदतीला धावून येते. हीच शारदा सर्वांच्या अंतर्यामी राहते.

गणेशः शारदा चैव सद्गुरुः सज्जनस्तथा।
आराध्यदैवतं मुख्यं सर्वं मे रघुनन्दन॥

ही शारदाच सर्व संतसज्जनांना आध्यात्मिक शक्तीचा पुरवठा करते. मारुतिराय हे श्रीरामचंद्रांच्या शक्तीचेच साकार रूप आहे.

© www.madhaveeraghuveer.com

23 APRIL

THURSDAY

WEEK 17

DAY 113-252

DATE 23.04.2015

| APRIL 2015 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

## एकाकी न रमते।

या मूळमायेमध्ये त्रिगुण असतातच परंतु ते साम्यास्थिती मध्ये असतात. म्हणजेच एखाद्या व्यक्तीला, वस्तूला, पदार्थाला तीन बाजूनी समान अंशामध्ये समान जोर लावला तर तो घटक तिळभरसुध्दा हलणार नाही. परंतु हेच जर सत्व, रज, तम या त्रिगुणांपैकी एखादा गुण जरी कमी जास्त झाला तरी गुणांची साम्यावस्था ढळते व विषमावस्था येते. अशी अवस्था म्हणजेच गुणक्षोभिणी माया। मूळ मायेमध्ये त्रिगुण असतात पण ते सुप्तावस्थेत असतात. आणि गुणक्षोभिणी मायेमध्ये ते कार्यरत होतात. हा सर्व विश्वाचा पसारा म्हणजे त्रिगुणांचा खेळ आहे. थोडक्यात माया ही परमेशशक्ती आहे. तिच्या मुळेच हे सर्व विश्व निर्माण झाले आणि भगवंतच या सर्वांचा आदिकर्ता आहे. ब्रह्मदेवापासून ते मुंगीपर्यंत सगळा पसारा (आकीटब्रह्मपर्यंतम्) त्यानेच निर्माण केला आहे. त्रिगुणात्मक मायेमध्ये चिदाभासरूपी बीयाचे सिंचन करून ईश्वर हे दृश्य विश्व सृष्टी निर्माण करतो सृष्टी, समष्टि व व्यष्टि यांच्या निर्मितीमागे हाच विचार आहे.

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम्।
संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत॥

या कारणे मी पिता। महद्ब्रह्म हे माता।
अपत्य जडसुता। जगडंबर॥

या सृष्टीमध्ये ८४ लक्ष जीवयोनि आहेत.

उद्भिज - वृक्षवेली, वनस्पती
स्वेदज - घामातून (घाणीतून) निर्माण होणार - उ ढेकूण
अंडज - पक्षी, सर्प
जरायुज - गर्भाशयातून उत्पन्न होणारा, सप्तधातुअसणारा स्त्री पुरुष मीलनातून उत्पन्न होणारा.

जो खरा ज्ञानी आहे तो हे जाणतो की जे जे मायामय आहे ते ते सर्व विनाशशील आहे. क्षर आहे. अशा महात्म्याला प्रपंचाचे मिथ्यत्व कळते. अज्ञानी मात्र त्यातच रमतात.

© www.madhavvairaghuveer.com

या त्रिगुणांच्या भिन्न भिन्न मिश्रणामुळेच ही बहुरंगी, बहुढंगी, बहुरत्ना वसुंधरा आकर्षित करते. या सृष्टीमध्ये क्षणोक्षणाला परिवर्तन आहे, सौंदर्य आहे, विविधता आहे, आकर्षकता आहे, आणि त्यामुळेच अज्ञानी सामान्य मनुष्य हरखून जातो. इथे उंचच उंच डोंगर आहेत. त्याचप्रमाणे खोल खोल दऱ्या आहेत. फळाफुलांच्या बागा आहेत तशीच गवताळ कुरणे आहेत. धनधान्यांनी समृद्ध शेती आहे तर मैलोगणती पसरलेली वाळवंट आहेत. झाडे वेली, पशु, पक्षी, किडा मुंगी, जलचर यांच्यामध्ये वैविध्य आहे. आणि माणसांच्या परी तर विचारायलाच नको. उंची, रंग, ठेवण, नाक, डोळे, स्वभाव या बाबतीत बघायचं झालं तर प्रत्येक जण Unique आहे. एकासारखा कोणी दुसरा नाही. आणि माणसाला तेच तेच पण आवडत नाही. Routine चा त्याला कंटाळा येतो. मग तो गिर्यारोहण करतो, शर्यती करतो, समुद्राच्या तळाशी जातो. विमानाने उंच उंच फेऱ्या मारतो. शिकार करतो. जीभेचे चोचले पुरवतो. या नानात्वामध्ये रमून जातो, रंगून जातो आणि हीच आहे 'माया'.

त्रिगुणात्मिका माया - ही माणसाला भुलवते, नाचवते, खेळवते, गोंधळात टाकते. कधी कधी मुक्तीच्या मार्गाला नेते. होत्याचं नव्हतं करते तर कधी भिकाऱ्याला श्रीमंत करून सोडते. मोठमोठ्यांची साम्राज्ये जी दिमाखाने आधिराज्य गाजवत होती, त्यांचं आज काय झालं? आणि रस्त्यावर अगदी गरीब घरातल्या, झोपडपट्टीतल्या मुलाला ती उद्योगपती, सेलिब्रिटी बनवते. हा सारा मायेचा खेळ आहे. घडवतेही तीच आणि बिघडवतेही तीच!

माया हेच एक कोडे आहे. अनेक तत्त्ववेत्ते आपापल्या परीने हे कोडे उलगडण्याचा प्रयत्न करत असतात. पू. आदि शंकराचार्यांनी आपल्या मायापंचक या स्तोत्रात मायेचे यथार्थ वर्णन केले आहे.

© www.madhaveeraghuveer.com

| APRIL | | | | | | 2015 |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

या मा सा माया।

विश्वप्रपंच तत्वतः सत्य नसूनदेखील सत्य असल्यासारखे भासवते. हे कार्य ज्याच्यामुळे घडून येते ती माया। माया ही एक शक्ति आहे जी स्वतः अदृश्य राहून कार्य घडवून आणते. कल्पनेतही अशक्य वाटणाऱ्या घटना ही लीलया घडवत असते. म्हणूनच आचार्य म्हणतात

श्रुतिशत निगमान्त शोधकानपि
अहह धनादि निदर्शनेन सद्यः।
कलुषयति चतुष्पदादि अभिन्नान्
अघटितघटना पटीयसी माया॥

वेद वेदांताच्या संशोधनात गढून गेलेल्या विद्वानानाही विजवैभवाचे प्रलोभन दाखवून त्यांची बुद्धि लगेचच कलुषित करते. त्यांना पशु बनवून धनिकांच्या दारामध्ये उभे करते. त्यांना राबवून घेते. खरोखर ही माया जादूगारीण अकल्पित, अतर्क्य घटना घडवून आणण्यात मोठी कुशल/वाकबगार आहे.

माया ही परमेश्वराची अनिर्वचनीय शक्ती आहे. तिच्या सहाय्याने तो हा विश्वप्रपंचाचा डोलारा उभा करतो. शुद्ध चैतन्य हे निर्विकार आहे. त्यामुळे त्याच्या ठायी काही कर्तृत्व नाही तर त्याउलट माया ही स्वभावतः जड असल्याने तिच्या ठायी देखील कर्तृत्व नाही. त्याच्याशिवाय ती काहीच करू शकत नाही आणि तिच्याशिवाय तो ~~[illegible]~~ काही करू शकत नाही.

Without him she can not exist &
without her he can not manifest.

तिच्याशिवाय तो व्यक्त होऊ शकत नाही आणि त्याच्याशिवाय तिला अस्तित्वच नाही.

एकमेकांच्या सहकार्याशिवाय काहीच घडू शकणार नाही. हा पुरुष म्हणजे, शिव शक्ती. ब्रह्म माया हे दोघांचे मिळून इतके अद्वैत आहे. एकाच रूपाची



© www.madhaveeraghuveer.com

ही दोन्ही अंगे आहेत. अर्धनारीनटेश्वर मध्ये दोन्ही अंगे परस्परांना पूरक आहेत.

शिवशक्तीच्या अद्वैताचा खेळ चालला भुवनपटी
त्रिगुणात्मक हे नाना रूपे चराचरातून नटतसे ॥

अशा या विश्वाच्या पटावर त्रिगुणांच्या फाशांचे दान टाकून या शिवशक्तीने खेळ मांडला आहे. आणि त्याने ते आनंदित होत आहेत.

परमेश्वराची अनिर्वचनीय शक्ती असणाऱ्या या मायेला विवेकाच्या आत्मज्ञानाच्या बळावर दूर सारता येते. तिचा निरास करता येतो आणि म्हणून तिला सत् म्हणता येत नाही. परंतु हा अवाढव्य विश्वप्रपंच तिच्याशिवाय उभारणे शक्य नाही म्हणून तिला असत्‌ही म्हणता येणार नाही.

खरं तर माया ही भावरूप आहे. तिला अभाव नाही. अविद्या, अज्ञान हे जरी मायावाचक शब्द असले तरी अभावातून कोणीही भाव निर्माण करता येत नाही. उत्पन्न झालेले विश्व हे भावरूप आहे म्हणून माया देखील भावरूप आहे.

मायेला नेहमी विद्युत शक्तीची उपमा दिली जाते. वीज ही दिसत नाही पण तिचे कार्य दिसते. पंख्यातून ती वाऱ्याच्या रूपाने प्रगट होते. T. V. मध्ये ती चित्ररूपाने दिसते. Heater मध्ये ती हवा गरम करते. इस्त्रीमध्ये ती कपड्यांच्या नीटनेटक्या घड्या घालते. बल्ब मधून प्रकाश देते. मोठमोठ्या कारखान्यात हिच्यामुळेच मोठमोठी यंत्र चालतात. तरीपण ही माया आहे. दिसत तर नाही पण अवाढव्य काम मात्र करतच असते.

हे कसे काय शक्य होते? माया स्वतः जड असून तिला एवढे कार्य कसे काय करता येते? कुऱ्हाड ही स्वतः जड आहे. तिला स्वतःची शक्ती नाही, बुद्धि नाही, विचार नाही विवेक तर नाहीच नाही. पण जोडीला एखादी व्यक्ती त्या कुऱ्हाडीच्या मदतीने लाकूड तोडू शकते तरीपण माया ही

© www.madhaveeragnihotri.com

## त्रिगुणांचे स्वरूप व वर्णन

08 ईश्वराची शक्तीचा उपयोग करून घडामोडी घडवते.
या सृष्टीतील प्रत्येक दृश्य गोष्ट मायिक आहे. सर्वांची
09 शरीरे मायेपासून बनलेली आहेत. अज्ञानी प्रापंचिक
लोकांच्या सर्व क्रिया बोलणे, स्पर्श करणे, विचार करणे,
10 समजणे या सर्व क्रिया मायेमुळेच घडतात.
या मायेपासून गुणक्षोभिणी अर्थात त्रिगुणात्मिका
11 माया निर्माण होते. ही संपूर्ण सृष्टी त्रिगुणांनी युक्त
आहे. मात्र यांचे प्रमाण सतत बदलत असते व कधीही
12 कायमचे नसते. ज्या ज्या गुणांचा जितक्या प्रमाणात प्रभाव
असेल तितक्या प्रमाणात कार्य घडत असते. सत्व, रज, तम -
13 सत्वगुण - निर्मलता, निर्विकारता, प्रकाशकता ---
सत्वगुण हा स्फटिकमण्याप्रमाणे निर्मळ व प्रकाशमय
14 आहे. तो शांत व स्थिर असतो. या प्रत्येक गुणाचे पुन्हा
दोन प्रकार आहेत. शुद्ध व शबल.
15 महाभारतामध्ये युधिष्ठिर हा सात्विक म्हणून प्रसिद्ध
होता. परंतु हाच त्याचा गुण जेव्हा शबल सत्वाकडे
16 झुकला तेव्हा तो द्यूतात बळी पडला. शुद्ध सात्विक
गुणामध्ये ज्ञान असते. समाजामध्ये आपण पाहतो की
17 सत्वगुणी व्यक्तीला ज्ञानाचा सुखाचा अहंकार असतो त्याला
अपूर्व सात्विक भावाचाही गर्व चढतो.

(margin: चेतना + ईश्वरविषयी / सर्व बाजूंनी ज्ञान)

18 सत्वगुणी व्यक्ती दयाळू, कधीही द्रोह न करणारी
धैर्याने सोसणारी, इतरांना नेहमी मदत करणारी असते
19 सत्वगुणी मनुष्य कसा ओळखावा?
परमार्थाची ~~गोडी~~ आवडी । उठे भावार्थाची गोडी ।
20 परोपकारी तातडी । तो सत्वगुण ।
ऐसी भक्तीची आवडी । नित्य वाढवावी गोडी ।
इच्छे देवद्वार झाडी । तो सत्वगुण ।
सत्वगुणी व्यक्ती समाजाचे घाव शांतपणे सोसतो
कठोर शब्द शांतपणे पचवतो. त्याची विषयांची आसक्ती
संपते. देहाभिमान गळून जातो. सर्व संतांची चरित्रे ही
2015 सत्वगुणाची साक्ष देतात.

© www.madhaveeraghuveer.com

MAY 2015

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

TUESDAY
WEEK 18
DAY 118-247
DATE 28.04.2015

28 APRIL

तुकाराम महाराजांसारखे संत प्रापंचिक आपल्याने इळमळत नाहीत. धर्माच्या पालनाने सद्गुण वाढत जातो.

परभूषणे भूषण। परदूषणे दूषण।
परदुःखे सिणे जाणा तो सत्वगुण॥ --

मात्र या सत्वगुणाचे दोन प्रकार आहेत. शुद्ध | शबल -

रजोगुण - सतत कार्यशीलता हे याचे वैशिष्ट्य आहे. कामना आणि आसक्ती यातून हा निर्माण होतो.
अनुकूल घडले तर अनुराग आणि } आनंद
प्रतिकूल घडले तर द्वेष } धुसफूस
अतितृष्णा असते. केवळ काम्यकर्म करतात. दुसरी कामे नकोशी वाटतात. मोबदल्यावर डोळा ठेवून काम करतात. तृष्णेची बेडी आपल्या पायात अडकवून घेतात.

आशा नाम मनुष्याणां काचिद् आश्चर्यशृंखला।
यया बद्धाः प्रधावन्ति मुक्तास्तिष्ठन्ति पंगुवत्॥

तृष्णेतून आसक्ती व आसक्तीमधून पुन्हा तृष्णा - दुष्टचक्र. लोभ व प्रवृत्तीच्या पाठोपाठ अशांती येते. मनाची चंचलता वाढते. रजोगुण हा भस्मासुर आहे. चांगले खावे, चांगले प्यावे. दुसऱ्याचे अभिलाषावे हा रजोगुण आहे. समाधान कधीच होत नाही. सतत अतृप्ती

लोभः प्रवृत्तिरारम्भः कर्मणामशमः स्पृहा।

तमोगुण - प्रमाद, आळस आणि निद्रा ही लक्षणे --
प्रमाद - जे करायला हवे ते न करणे व निषिद्ध कर्म करणे
आळस - कार्यशक्तीचा अभाव
निद्रा - अनावश्यक व अतिरिक्त निद्रा.
यातून विस्मृति होते. वर्तनात दोष येतात.
शकुनि, दुर्योधन,
अप्रकाश, कर्तव्यकर्म न करण्याकडे कल वाढतो. सत्कर्म करायला नाखूष मात्र व्यभिचार, हत्या, हिंसा, मद्यपान, चोरी करण्यासाठी उत्साह वाटतो.



घुबडाला अंधारात चांगले दिसते.

© www.madhavaraghuveer.com

मृत्यु - सत्त्वगुणाची वृद्धि झाली असताना जर मृत्यु आला तर त्या साधकाला दिव्य लोक प्राप्त होतो मात्र मोक्ष लाभत नाही परंतु सालोक्य मिळू शकतो.

रजोगुणाची वाढ झाली असता मृत्यु आला तर पुढचा जन्म कर्माची आसक्ती असणाऱ्या पुरुषांच्या देहामध्ये जन्म मिळतो.

तमोगुण वाढलेला असताना मृत झालेला पुरुष मात्र नीच योनिमध्ये (नरक किंवा किडा, मुंगी, सर्प, विंचू) जन्म घेतो.

हे तीनही गुण कमीअधिक प्रमाणामध्ये प्रत्येकात असतात. मात्र कालानुसार, प्रसंगानुसार यापैकी एखादा गुण वाढतो, प्रबळ होतो व तो इतर गुणांना दाबून टाकतो पराभूत करतो. दोघांपेक्षा वरचढ ठरतो. Overtake.

अशाच एखाद्या गुणाचे प्राबल्य वाढल्याने कधीकधी चांगल्या सज्जन व्यक्तींच्या हातूनही भयंकर अपराध घडतो. तर कधी कधी अत्यंत दुष्ट माणसाकडून सत्कृत्ये केली जातात.

रजस्तमश्चाभिभूय सत्त्वं भवति भारत।
रज: सत्त्वं तमश्चैव तम: सत्त्वं रजस्तथा॥

* गुणानुसार कार्य घडते

परंतु हा दुर्लभ असा मानवजन्म लाभला असल्यामुळे सात्त्विक माणसाने सुद्धा रज-तमाला कधी वरचढ होऊ देऊ नये. रज-तम माजले तर कार्याची हानि होते.

उपभोग हे काही वाईट नाहीत. देहधारणेपुरते, प्रकृति स्वास्थ्य सांभाळण्यापुरते पंचेंद्रियांच्या विषयांचे सेवन करावे. परंतु मर्यादा बाहेर गेले तर मात्र विषयांचे विष होते. त्यातून माणसाचे अध:पतन होते. हे तीनही गुण योग्य प्रमाणात आवश्यक आहेत.

सत्त्व - ज्ञानार्जनाला | रज - कार्यशीलता | तम - निद्रा, क्रोध.

©www.madhaveeragruveer.com

जसे आपण चष्मा, चप्पल, गाडी त्या त्या कारणापुरते व तेवढ्यापुरते वापरतो, त्याच्या आहारी जात नाही तसेच त्रिगुणांच्या रज्जूंचे वापर करून, त्यात न गुंतता त्याच्या पलीकडे जाता यायला हवे.

"गुणा गुणेषु वर्तन्ते" अशी तटस्थ भूमिका हवी. असा जो कोणी केवळ साक्षीरूपाने गुणांकडे पाहतो आणि सच्चिदानंदघन परमात्म्याच्या ठिकाणी एकत्वभावाने स्थिर राहतो. आपल्या मूळ स्थितीपासून ढळत नाही तो गुणातीत / तो उदासीन Neutral असतो.

आपल्यातला देखील आपल्या जीवनात तमोगुणाचे प्रमाण अगदी मीठाप्रमाणे (अल्प) ठेवायचे. तमोगुण कमी कमी करत रजोगुणाकडे जायचे. त्याचाही आवश्यक तेवढा वापर करून सत्त्वगुणाकडे झेप घ्यायची. सात्त्विक कर्मे करीत शुद्ध सत्त्वाकडे जायचे आणि त्यापुढची पायरी म्हणजे त्रिगुणांच्या पलीकडे जायचे, गुणातीत व्हायचे.

वस्तुतः आत्मा हा स्वयंपूर्ण आहे. आत्म्याची गती ऊर्ध्वगामी आहे. परंतु एखाद्या वस्तूला जड वजन बांधले म्हणजे ती जशी खाली खेचली जाते. त्याप्रमाणे स्वयंप्रकाशी आत्म्याला त्रिगुणांच्या बंधनांनी बांधले आहे. हे वजन, ही बेडी जर दूर केली तर आत्मा मूळच्या स्थितीला जाईल. स्वस्वरूपाच्या ठायी होईल. मोठा आनंद मिळेल.

एक एक गुण मागे टाकत जायचे आणि शुद्ध सत्त्वगुणाला आपला स्वभाव करून टाकायचा. तात्पुरता नाही तर कायमचा! सत्त्वगुण हा काही चार दिवस किंवा घरकामासाठी आणलेला पाहुणा नाही तर त्याला घरचा करून टाकायचा. रोजचा करून टाकला की तो सहजस्वभाव होऊन जातो. आणि स्वाभाविक रोज घडणाऱ्या गोष्टीचे आपल्याला अप्रूप वाटत नाही. तसेच मग सात्त्विक कृत्यांच्या देखील अहंकार वाटणार नाही. अहंकार तर सोडाच पण अभिमान देखील वाटू नये इतका तो अंगात मुरला पाहिजे.



© www.madhaveeraghuveer.com

प्रथम अहंकार जिंकायचा मग आसक्ती जिंकायची मग केलेल्या कर्माच्या फळाविषयी देखील लोभ उरत नाही. सर्वच कर्मे स्वतः उपभोग न घेता परोपकारासाठी करायची. हे निसर्गाकडून शिकायचं. फळ खाण्यापेक्षा ते न खाणेच अधिक गोड असते. देण्यात जो आनंद आहे तो उपभोगण्यात नाही.

पिबन्ति नद्यः स्वयमेव नाम्भः
स्वयं न खादन्ति फलानि वृक्षाः।
नादन्ति सस्यं खलु वारिवाहाः
परोपकाराय सतां विभूतयः॥

© www.madhaveeraghuveer.com

१२ मार्च २०२१



| MAY | | | | | | 2015 |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

॥ श्री ॥

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ब्रह्म अनंत आहे अर्थात त्याची उपासना अनंत गुणांनी करता येते. सर्व विश्वाचे मूळ हे ब्रह्म आहे. त्यामुळे विश्वात आढळणाऱ्या अनंत गुणांचे व अनंत शक्तींचे वसतिस्थान ब्रह्मच आहे. मात्र कोणतहि गुण, कोणतिहि शक्ती सगुणात आली की तिचे अनंतपण अंतर्धान पावते. ते सान्त होते. आणि म्हणूनच साधकाला उपासनेसाठी सगुण कितीही सोयीचे असले तरी त्याच्या मागे असणारे अनंत निर्गुण ध्यानात घेऊनच साधना करायला हवी.

साधक भगवंताच्या ज्या गुणाचे चिंतन करतो त्या गुणाचा प्रकाश साधकाच्या ठिकाणी प्रकट होतो. जसजशी त्याची उपासना भगवंताच्या अधिकाधिक जवळ जाईल, तसतसे भगवंताचे गुण त्याच्या वागण्यात दिसू लागतील. ३. ब्रह्म सर्वांच्या पलीकडे आहे. सर्वश्रेष्ठ आहे पवित्र आहे. तेजस्वी, पूर्ण, अचल आहे.

ब्रह्म सगळ्यांच्या अतीत आहे. पलीकडे आहे. याचा अर्थ या सर्व्या अशाश्वताच्या पलीकडे ते मात्र शाश्वत आहे. या विधानाचे यथार्थ ज्ञान झाले की मग खरा साधक कधीच अशाश्वतामध्ये रमणार नाही. इतकेच काय तर स्वतःचा देह, मन, प्राण हे देखील तात्पुरते आहेत हे समजल्यामुळे एका आत्म्याशिवाय इतर कोठेही त्याचा जीव रमणार नाही.

केवळ ब्रह्मच सर्वश्रेष्ठ आहे याची अनुभूति आली की मग प्रत्येक घटनेमध्ये भगवंताच्या सत्तेचाच साक्षात्कार घडायला लागेल. आणि मग तिथे जीवाच्या कर्तेपणाला स्थानच उरणार नाही. ब्रह्म हे अत्यंत पवित्र आहे. कारण त्याला अपवित्र करू शकेल अशी दुसरी वस्तूच नाही.

तया एकरूपासी दूजे न साहे।
मना संत आनंत शोधूनि पाहे।

© www.madhaveeraghuveer.com

भारतीय ज्ञानी पुरुषांनी शुभ्र हंसाला पवित्रपणाचे प्रतीक मानले आहे. हंसाच्या अंगी दोन ~~असे~~ गुण – अत्यंत स्वच्छता नीरक्षीरविवेक! ज्याचे पंचकोश अत्यंत निर्मळ झालेले आहेत आणि विवेकाने जो अशाश्वत पसाऱ्यामधून शुद्ध भगवंत निवडून घेतो अशा ज्ञानी पुरुषाला परमहंस म्हटले आहे. असा परमहंस जीवनाच्या सरोवरात विहार करत असतो.

अशा या आत्म्याची मूर्त व अमूर्त अशी दोन स्वरूपे आहेत. अर्थात अमूर्त हेच त्याचे खरे मूळस्वरूप आहे. या विश्वामध्ये जरी इतकी विविधता आढळत असली तरी त्यामध्ये गोंधळ नाही. उलट शिस्त आहे. एकता आहे. प्रत्येक मनुष्य जरी Unique असला तरी 'माणूसपणा' या गुणाच्या दृष्टीने सबंध मानवजात ही एकच आहे. मग तो आफ्रिकेच्या जंगलात राहणारा असो किंवा विकसित देशातील उच्चपदस्थ अधिकारी असो. आहे तो शेवटी माणूसच!

म्हणजे माणसाचा माणूसपणा, कुत्र्याचा कुत्रेपणा असा विचार करत गेलो तर सर्व अमूर्तीचे अमूर्त निष्पन्न होते. ते म्हणजे या सर्वांमध्ये जिवंतपणा आहे. हे सचेतन आहे. आणि त्याही पलिकडे सचेतन / अचेतन या दोहींना व्यापून राहणारे ते सर्वात मोठे अमूर्त आहे. त्यालाच ब्रह्म म्हणतात.

मात्र हा विचार बुद्धीला आकलन होतो. पण प्रत्यक्ष त्याचा अनुभव येत नाही. या अमूर्ताच्या साक्षात्कार होण्यासाठी साधकाने स्वतः अमूर्त बनायला हवे. आपण स्वतः उपाधिरहित होऊन विशाल बनायला पाहिजे.

'मी देहात आहे' ही दृढ भावना काढून टाकून मी भगवंतात / आत्म्यात आहे ही भावना रुजवायला हवी. तर आपल्यालाही त्याच्याइतकेच विशाल होता येईल. जितकी तळमळ अधिक तितका तो हमखास प्रकट होतो. आपले अस्तित्व त्याच्यामध्ये मिसळून जायला हवे. आपल्याला शून्याकार व्हायचंय!

हे शून्य म्हणजे आहे तरी काय?
१. कोणत्याही गोष्टीचा अभाव, राहित्य किंवा रिक्तता सूचित करणारे चिन्ह
२. आकाश / अवकाश - पोकळी Vaccume, Space.
३. विष्णूच्या सहस्रनामांपैकी एक

सुवर्णवर्णो हेमाङ्गो वराङ्गश्चन्दनाङ्गदी ।
वीरहा विषमः शून्यो घृताशीरचलश्चलः ॥
सत् नाही असत् नाही अशा भावाच्या पलीकडे -
इंद्रियग्राम ज्ञानाच्या पलीकडे
गुणरहित, आकाररहित असल्याने 'शून्य'
इथे शून्य अभावात्मक नाही तर ते ब्रह्माचे तटस्थ लक्षण आहे.
४. परमात्मतत्त्व
५. चराचर सृष्टीचे उत्पत्तिस्थान
६. मोक्ष - शून्यावस्था
७ निरंतर मौन / निरपेक्षत्व
८ शून्य शिखर -- शून्य महाल -- शून्य मंडल

शून्य शिखर पर अनहद बाजे जी ।
राग छत्तीस सुनाऊंगा । सुनाऊंगा ॥
निर्भय निर्गुण गुण रे गाऊंगा । गाऊंगा ॥

शून्यकर्ण - कान नसलेला — साप
शून्यचरण — पाय नसलेला - साप
शून्य वेळा - Zero hour शून्य प्रहर
मध्यरात्र, माध्यान्ह. - रेल्वे समय सारणी
शून्यावस्था - द्वंद्वातीत अवस्था
शून्याकार - स्थल कालाची मर्यादा नसलेला.



ब्रह्मरंध्र. नंदद्वार. दशमाचे द्वार, विहित द्वार
सहस्रार चक्र, मध्यपथ, गगनमंडल --

© www.madhaveeraghuveer.com

मन्त्राणां मातृका देवी शब्दानां ज्ञानरूपिणी ।
ज्ञानानां चिन्मयातीता शून्यानां शून्यसाक्षिणी ॥
यस्याः परतरं नास्ति सैषा दुर्गा प्रकीर्तिता ॥

अखण्डमण्डलाकारं व्याप्तं येन चराचरम् ।
तत्पदं दर्शितं येन तस्मै श्री गुरवे नमः ॥

पातंजल योग सूत्र ३.३.
तदेवार्थमात्र निर्भासं स्वरूपशून्यमिव समाधिः ।
ध्यानाविषयीची अर्थमात्रता व ध्यात्याची स्वरूपशून्यता म्हणजे समाधि
समाधी ही ध्यानाची पक्व अवस्था आहे. म्हणजे ध्यानावस्थेतूनच पुढे समाधि अवस्थेत प्रवेश करायचा आहे. आलंबनाचा एकमात्र प्रत्यय अनुभवणारा ध्याताही इथे जणू काही (इव) शून्य झालेला असतो. त्याचे अस्तित्व जणू काही शून्य होऊन जाते. अर्थात हे शून्य होणे कायमचे नसून ते काही काळापुरते असते. त्या स्थितीत तो जणू शून्य होऊन गेलेला असतो. त्यामुळे समाधिस्थितीतून बाहेर आल्यावर सुद्धा त्याला त्या स्थितीचे वर्णन करता येणार नाही. अनुभवणाराच शून्य झाल्यामुळे तिथे अनुभवही नाही न स्मृतिही नाही.

गुरु - शिष्य - बोधसंवाद - गुरु श्रेष्ठ अवस्थेत व शिष्य शून्यावस्थेत असेल तर शिष्य क्रियाशील होऊन गुरूंची शक्ती स्वीकारण्यास पात्र होतो.

शून्याचा शोध - भारताने जगाला दिलेली देणगी त्यामुळेच दशमान पद्धति शक्य झाली

अपरोक्षानुभूति
भाववृत्त्या हि भावत्वं शून्यवृत्त्या हि शून्यता ।
ब्रह्मवृत्त्या हि ~~[illegible]~~ पूर्णत्वं तथा पूर्णत्वमभ्यसेत् ॥ १२९॥



© www.madhaveeraghuveer.com

चिन्ताशून्यमदैन्यभैक्ष्यमशनं पानं सरित्वारिषु
स्वातन्त्र्येण निरंकुशा स्थितिरभीर्निद्रा श्मशाने वने।
वस्त्रं क्षालनशोषणादिरहितं दिग्वास्तु शय्या मही
संचारो निगमान्तवीथिषु विदां क्रीडा परे ब्रह्मणि॥

त्यामध्ये चिंता वा दैन्य नाही असे भिक्षान्न हेच ज्ञानी लोकांचे भोजन आहे व नद्यांचे पाणी हे त्यांचे पेय आहे. स्वातंत्र्यामुळे त्यांना निरंकुश अवस्था प्राप्त झालेली असते. निर्भय असल्याने त्यांना स्मशानात किंवा वनातही निद्रा येते. धुणे, वाळवणे इ. क्रियांची आवश्यकता नसलेले दिशा॥ हेच त्यांचे वस्त्र आहे. पृथ्वी हीच त्यांची शय्या आहे. वेदांतमार्गावर त्यांचा संचार आणि परब्रह्माठायी क्रीडा असते.

सुबुद्धि वनामाजी निजून जावे।
उशाशी भुजेचे मृदु पाद घ्यावे।
दिशांच्या महापट्ट ओढूनि घ्यावा
प्रभाते मनी राम चिंतीत जावा॥

प्रवास शून्याकडून शून्याकडे आहे. तरीहि आयुष्य जगताना आपण संख्या गोळा करतो. संपत्ति / ग्रंथ / पदव्या / मित्र / नातेवाईक / शिष्य - - - सर्व इथेच राहते.

धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे
भार्या गृहद्वारे जनाः स्मशाने
देहश्चितायां परलोकमार्गे
कर्मानुगो गच्छति जीव एकः।

Golden Ratio - 1 : 1.6 - Discipline - -

कस्त्वं कोऽहं कुत आयातः का मे जननी को मे तातः।
इति परिभावय सर्वमसारं विश्वं त्यक्त्वा स्वप्नविचारम्॥

© www.madhaveeraghuveer.com

॥श्रीराम॥

श्रीराम जय राम जयजय राम।
श्रीराम जय राम जय जय राम॥

श्रीरामचंद्रा करुणा समुद्रा।
ध्यानो तुझी राजस योग मुद्रा।
नेत्री न ये रे तुजवीण निद्रा।
कै भेटसी वा मजला सुभद्रा॥

जय जय रघुवीर समर्थ॥

दाशरथी राम
रघुकुळ राम
जगदीशमूर्ति असा अयोध्येचा अंतरंगी निवसणारा।
[illegible] वंदन

श्रीतारकमंत्राचे गायन या अनुष्ठानास प्रारंभ

कल्याणानां निधानं कलिमलमथनं पावनं पावनानां।
पाथेयं यन्मुमुक्षोः सपदि परपदप्राप्तये प्रस्थितस्य
विश्रामस्थानमेकं कविवरवचसां जीवनं सज्जनानां
बीजं धर्मद्रुमस्य प्रभवतु भवतां भूतये रामनाम।